# कबड्डी पंच उजळणी शिबीर दि.१३ ऑगस्ट २०२१

# अहवाल.

दि.13 ऑगस्ट २०२१ रोजी सकाळी ठिक १०-३० वाजता नाशिक जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या सर्व पंचाचे उजळणी शिबीर चांदवड महाविद्यालयाने आयोजीत केले. या शिबीरात नाशिक जिल्हयातील ५२ पंच व इतर अधिकारी उपस्थित होते. उदघाटन कार्यक्रमाचे अध्यक्षीय स्थान महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. दत्ता शिंपी यांनी भुषवीले. कबड्डीच्या नियमांवरती श्री. सतिष सुर्यवंशी व पंच कसा असावा या विषयी श्रिमती शैलजा जैन (कबड्डी मार्गदर्शक) यांनी मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे इंग्रजी विषयाचे प्राध्यापक ए. ए. वकील यांनी प्रथम सत्रात खेळाडूंचे व्यक्तीमत्व या विषयावर मार्गदर्शन केले. दु.१२ वा. पुणे येथिल प्राध्यापक शकुर सय्यद ( विद्यापीठाचे माजी खेळाडू) यांनी ऑन लाईन पध्दतीने पंचाचे व्यक्तीमत्व या विषयी आपले विचार मांडले. या नंतर दिवंगत श्री. फिदा कुरेशी यांची चित्रफीत दाखवण्यात आली. दुपारच्या सत्रात डॉ. मनोज पाटील यांनी आरोग्य व आहार या विषयी पंचाना चांगले मार्गदर्शन केले. शेवटच्या सत्रात श्री. सतीष सुर्यवंशी यांनी कबड्डी खेळाचे बदलेले नियम व नियमातील संदिग्धता बाबत एक वाक्यता या बाबत सविस्तर मार्गदर्शन केले, या सत्रात पंचानी उपसथ्ीत केलेल्या कबड्डीच्या नियमां वरील प्रश्नांन बाबत सविस्तर चर्चा करुन श्री. सतीष सुर्यवंशी, श्री. राजेश निकुंभ, श्री. सुधाकर कातकडे व श्री. डॉ. दत्ता शिंपी यांनी उत्तरे दिली. कबड्डी पंचाचे उजळणी शिबीरात आलेलया सर्व मान्यवरांचे व पंच मंडळाचे प्रा. अजय नायर सरांनी आभार मानले व कार्यक्रमाच्या शेवटी राष्ट्रगीत घेऊन कार्यक्रमाचे समारोप करण्यात आले.



पंच उजळणी शिबीर उदघाटन प्रसंगी उपप्राचार्य डॉ. दत्तात्रय शिंपी, उपप्राचार्य सुरेश पाटील, प्रा. ए. ए. वकील, श्री. सतिष सुर्यवंशी, श्री. अनिल आहिरे व श्री. अशोक गरुड




पंच उजळणी शिबीरात चांदवड महाविद्यालयाच उपप्राचार्य डॉ. दत्तात्रय शिंपी यांचा सत्कार करतांना नाशिक जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या सदस्य श्री. शरद पाटील व इतर मान्यवर.




पंच उजळणी शिबीरात श्रिमती. शैलजा जैन (कबड्डी मार्गदर्शक) नाशिक यांचा सत्कार करतांना चांदवड महाविद्यालयाचे प्रा. ए. ए. वकील सर.




पंच उजळणी शिबीरात खेळाडूंचे व्यक्तीमत्व या विषयावर मार्गदर्शन करतांना चांदवड महाविद्यालयाचे प्रा. ए. ए. वकील सर.




पंच उजळणी शिबीरात प्राध्यापक शकुर सय्यद (विद्यापीठाचे माजी खेळाडू) यांनी ऑन लाईन पध्दतीने पंचाचे व्यक्तीमत्व या विषयी मार्गदर्शन करतांना.




पंच उजळणी शिबीरात मानवी  जीवनात खेळाचे महत्व व कबडडीचा झालेला विकास या विषयी दिवंगत श्री. फीदा कुरेशी यांची चित्रफीत सादर करतांना.



पंच उजळणी शिबीरात आरोग्य व आहार या विषयी पंचाना मार्गदर्शन करतांना चांदवड महाविद्यालयाचे डॉ. मनोज पाटील सर.




पंच उजळणी शिबीराच्या कार्यक्रमाचे समारोप प्रसंगी उपप्राचार्य डॉ. दत्तात्रय शिंपी, प्रा. ए. ए. वकील, श्री. सतिष सुर्यवंशी, श्री. अनिल आहिरे, श्री. अशोक गरुड व शिबीरात सहभागी झालेले सर्व पंच.




आभार प्रदर्शन करतांना प्रा.अजय नायर •